जा.क्र.सनिमं/कलम७७-१अ/प्रा.अधि/११४/सन १७
सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, मंगळवेढा
यांचे कार्यालय, मंगळवेढा ता.मंगळवेढा
दिनांक -०२/०५/२०१७

वाचले :- १) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ -१(अ)
२) या कार्यालयाचे जा.क्र.सनिमं/कलम७७-१अ/प्रा.अधि./३४१/१५दि.६/७/२०१५
३) या कार्यालयाचे जा.क्र सनिमं/प्रशा/क७७-१ (अ)/प्रा अधि/४०७/२०१५ दिनांक १६/०७/२०१५
४) मा.विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था पुणे विभाग पुणे यांचेकडील जा.क्र विपु/आस्था/पदो/विनो/३/६/४११/२०१६ दि २०/०५/२०१६

**प्रस्तावना :**

ज्या अर्थी उक्त वाचले क्रं २ चा आदेश व वाचले क्र.३ चा अंशत बदलाच्या आदेशा अन्वये डोंगरगाव विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या.डोंगरगाव या संस्थेची संचालक मंडळाची मुदत दि.०४/०७/२०१३ रोजी संपलेली असून संस्थेचे संचालक मंडळ बरखास्त करुन त्यांच्या ऐवजी संस्थेचे दैनदिन कामकाज व संस्थेच्या मतदार यादया तयार करुन निवडणुकीची व्यवस्था करण्यासाठी प्रशासक/प्राधिकृत अधिकारी म्हणुन श्री एस.बी.लिंबोळे सहकारी अधिकारी श्रेणी -२ मंगळवेढा यांची नेमणुक केलेली होती.

ज्या अर्थी उक्त वाचले क्रं ४ च्या आदेशाअन्वये श्री एस.बी.लिंबोळे याची प्रशासकीय कारणास्तव बदली झालेली आहे.

त्या अर्थी वरील प्रमाणे आदेशात खालील प्रमाणे अंशत: बदल करीत आहे.

**:: अंशत: बदल आ दे श ::**

मी **बालाजी.एस.कटकदौंड,सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था मंगळवेढा तथा तालुका सहकारी निवडणूक अधिकारी मंगळवेढा** महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७-१ (अ)(ब) अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकाराचा वापर करुन डोंगरगाव विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी मर्या डोंगरगाव ता.मंगळवेढा या संस्थेची मुदत संपुष्टात आलेले संचालक मंडळ बरखास्त करुन त्यांच्या ऐवजी संस्थेचे दैंनदिन कामकाज व संस्थेच्या मतदार यादया तयार करुन निवडणुकीची व्यवस्था करण्यासाठी प्रशासक/प्राधिकृत अधिकारी म्हणुन **श्री.व्ही.एस.नाकेदार ,** सहकारी अधिकारी श्रेणी-२ यांची नेमणूक करीत आहे.

सदरचा आदेश आज दिनांक -०२/०५/२०१७ रोजी माझे सही शिक्क्यानिशी पारीत करीत आहे.

**सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था मंगळवेढा**
**तथा तालुका सहकारी निवडणूक अधिकारी मंगळवेढा**

प्रति,
१. **श्री.व्ही.एस.नाकेदार ,** सहकारी अधिकारी श्रेणी-२, प्राधिकृत अधिकारी. डोंगरगाव वि. का. सेवा सह.सो. लि. डोंगरगाव
२.चेअरमन/ व्हा.चेअरमन/ सचिव, डोंगरगाव विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या डोंगरगाव
३. शाखा व्यवस्थापक, सो.जि.म.सह बँक लि.सोलापूर शाखा- मंगळवेढा ता.मंगळवेढा

**प्रत माहितीस्तव सविनय सादर:-**